भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जलसे, भीमगीते, पोवाडा, गीतगायन व शाहीरी या माध्यमांतून प्रचार व प्रसार करणा-या व्यक्तींना लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः वाकपु - २०२५ / प्र. क्र. ५२ / समन्वय
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी २०२६

**वाचा :** १. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : सरपू-२००४/प्रक.१८४/मावक-४, दि.१६ जुलै २००४

२. शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : पुरस्कार-२०१७/ प्र.क्र.२१/विघयो, दि.०३ मार्च २०१७

३. शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : प्रसिध्दी-२०२५/प्रक्र.०८/ समन्वय, दि.०४ मार्च २०२५

**प्रस्तावना :** लोककवी वामनदादा कर्डक यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या ओजस्वी वाणीतून आणि समर्थ लेखणीतून महाराष्ट्राच्या घराघरात व खेड्यापाड्यात पोहोचवण्याचे काम केले असून त्यामुळे ते आंबेडकरी चळवळीतील एक प्रभावशाली लोककवी म्हणून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कविता सामाजिक अन्याय, जातिभेद, विषमता याविरुद्ध बंड पुकारणाऱ्या असल्यामुळे "विद्रोही कवी" म्हणून त्यांची ओळख असून त्यांनी अनेक गाणी, पोवाडे, भीमगीते लिहिली. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर अनेक सभा व आंदोलनामध्ये सहभाग घेतला. त्यांच्या कवितांनी लाखो लोकांना प्रेरणा मिळाली असून लोककवी वामनदादा कर्डक यांचे समाजातील योगदान विचारात घेता त्यांच्या नावाने पुरस्कार देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जलसे, भीमगीते, पोवाडा, गीत गायन व शाहीरी या माध्यमातून प्रचार व प्रसार करणा-या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी ६ महसुली विभागांतून प्रत्येकी एका व्यक्तीस पुरस्काराप्रित्यर्थ रु.५१,०००/- याप्रमाणे "लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार" ही योजना सुरु करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेचे निकष व नियमावली **"परिशिष्ट- अ"** प्रमाणेच राहतील.

२. सदर लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार व इतर अनुषंगिक बाबींवरील खर्च हा "मागणी क्र.एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण,८०, सर्वसाधारण, ७८९, अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना, (०१) परितोषिक/बक्षिसे, (०१)(०२) शाहू, फुले, आंबेडकर यांच्या नावे पारितोषिक देणे (कार्यक्रम) २२२५ जी ४४८" या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात येईल.

३. याकरिता प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील व आयुक्त, समाजकल्याण, पुणे हे नियंत्रक अधिकारी राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२१६१५४०२३९७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradnya Vijaysinh Deshmukh

Digitally signed by Pradnya Vijaysinh Deshmukh
DN: c=IN, o=Personal,
pseudonym=73bf4e550cf1442b9726aab38412bd4f,
2.5.4.20=292d6a247113f13d8dc14dd5064d13c6ca75df63f1f16bbb75de3c53eff04e2e, postalCode=400011, st=Maharashtra,
serialNumber=3d331ee44ae91c7d48d9b9dbbf7b7a7264f269283fac405332fed75cfa968e89, cn=Pradnya Vijaysinh Deshmukh
Date: 2026.02.16 16:51:15 +05'30'

**( प्रज्ञा देशमुख )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, समाज कल्याण, पुणे.
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व जिल्हाधिकारी.
९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१०. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
११. महासंचालक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, मुंबई.
१२. व्यवस्थापकीय संचालक, सामाजिक न्याय विभाग अधिनस्त सर्व महामंडळे.
१३. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण.
१४. सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे समाज कल्याण अधिकारी.
१६. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) - १ , महाराष्ट्र, मुंबई.
१७. महालेखापाल ( लेखापरिक्षा ) - १ , महाराष्ट्र, मुंबई.
१८. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) - २ , महाराष्ट्र, नागपूर.
१९. महालेखापाल ( लेखापरिक्षा ) - २ , महाराष्ट्र, नागपूर.
२०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२२. सर्व मंत्रालयीन विभाग.
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
२४. निवडनस्ती, समन्वय कार्यासन.

**शासन निर्णय क्रमांक वाकपु - २०२५ / प्र. क्र. ५२ / समन्वय, दिनांक : १६ फेब्रुवारी २०२६**

**सोबतचे परिशिष्ट "अ"**

१. **पुरस्कारासाठी पात्रता** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जलसे, भीमगीते, पोवाडा, गीतगायन व शाहीरी या माध्यमातून प्रचार व प्रसार करणा-या व्यक्ती.

२. **पुरस्कारासाठी अटी व शर्ती** :

१. लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कारासाठी पात्र व्यक्ती महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक राहील.

२. लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कारासाठी आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी विहीत केलेल्या नमुन्यात व्यक्तीने अर्ज करणे व त्यापृष्ठयर्थ आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करणे आवश्यक राहील.

३. लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कारासाठी पात्र व्यक्तीने राज्य पातळीवर किमान १० वर्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जलसे, भीमगीते, पोवाडा, गीतगायन व शाहीरी या माध्यमातून प्रचार व प्रसारकार्य केल्याची माहिती सादर करणे आवश्यक राहील.

४. लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कारासाठी पात्र व्यक्तींची निवड करण्यासाठी शासन स्तरावरुन मंजूरी देण्यात येईल. सदर शासन मंजुरी अंतिम असेल. याबाबत कोठेही अपिल करता येणार नाही.

५. लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कारासाठी वयोमर्यादा पुरुषांकरिता किमान ५० वर्षे पूर्ण व स्त्रियांकरिता किमान ४० वर्षे पूर्ण इतकी राहील. अद्वित्तीय कार्यासाठी वयोमर्यादेत शिथिलता देण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने राज्यस्तरीय समितीस असतील.

६. शासकीय व निमशासकीय व्यक्ती सदर पुरस्कारासाठी पात्र समजली जाणार नाही.

७. निष्कलंक चारित्र्य असणारी व्यक्ती सदर पुरस्कारासाठी पात्र असेल. त्यानुषंगाने चारित्र्य पडताळणीच्या अटीत शिथिलता देण्यात येणार नाही.

३. **पुरस्कारासाठीची कार्यपद्धती** :

| अ. क्र. | कार्यपद्धती |
|---|---|
| १. | आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी किमान ४ शासन मान्य जास्त खपाच्या वृत्तपत्रात अर्ज मागविण्याच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिध्द करतील. |
| २. | आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी विहीत केलेल्या नमुन्यात व्यक्ती संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे अर्ज सादर करतील. |

| | |
|---|---|
| ३. | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र तसेच अपात्र व्यक्तींचे प्रस्ताव आवश्यक त्या समर्थनासह प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांना सादर करतील. |
| ४. | संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण हे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन पात्र तसेच अपात्र व्यक्तींचे प्रस्ताव आवश्यक त्या समर्थनासह आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करतील. |
| ५. | आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सर्व प्रादेशिक उपायुक्त यांचेकडून प्राप्त प्रस्तावांची नियमानुसार तपासणी व छाननी करून शासनाकडे प्रत्येक महसूल विभागनिहाय किमान ५ पुरुष व ५ महिला याप्रमाणे एकूण ६० पात्र व्यक्तीची राज्यस्तरीय समितीस शिफारस करतील. |
| ६. | राज्यस्तरीय समिती आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी शिफारस केलेल्या व्यक्तीमधून प्रत्येक महसूल विभागनिहाय प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ६ पुरस्कार व्यक्तींची निवड करून मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी सादर करेल. त्यामध्ये ६ व्यक्तींपैकी किमान २ महिला असतील. महिला उपलब्ध न झाल्यास त्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांचे आदेश अंतिम असतील. |
| ७. | शासनाने निश्चित केलेल्या दिवशी सदर पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित केला जाईल. |

४. **पुरस्कारासाठी आवश्यक कागदपत्रे** : आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे पात्र-अपात्र पुरस्कारार्थीचे प्रस्ताव राज्यस्तरीय समितीसमोर सादर करताना प्रस्तावाबरोबर इतर आवश्यक कागदपत्रांसह अ. शिफारस केलेल्या व्यक्तीचे संपूर्ण जीवनचरित्र, ब. व्यक्तीने संपादित केलेले विशेष यश किंवा केलेले उत्कृष्ट कार्य, क. पासपोर्ट आकाराचे व्यक्तीचे छायाचित्र (२ प्रती) व ड. चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र कागदपत्रे सादर करतील.

५. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे किंवा शासनाकडे पुरस्कारासाठी परस्पर आलेले वैयक्तिक अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच अपूर्ण भरलेले अर्ज व अपूर्ण प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

६. **पुरस्कार निवडीसाठी राज्यस्तरीय समिती** : आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचेकडून छाननी करून प्राप्त झालेले पात्र व्यक्तींचे प्रस्ताव सदर पुरस्कार निवडीसाठी उक्त नमूद केल्याप्रमाणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : पुरस्कार - २०१७ / प्र. क्र. २१ / विघयो, दिनांक ०३ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मा. मंत्री ( सा.न्या. ) यांच्या अध्यक्षतेखाली विहीत केलेल्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत ठेवून सदर समितीने मान्यता दिलेल्या व्यक्तींची मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेनंतर लोककवी वामनदादा कर्डक

पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. त्यासाठी समारंभाचे ठिकाण राज्यस्तरीय समितीमार्फत निश्चित करण्यात येईल.

७. **<u>पुरस्कार संख्या</u>** : महाराष्ट्र राज्यातील ६ महसूल विभागातून प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ६ पुरस्कार प्रदान करण्यात येतील. त्यात किमान २ महिलांचा समावेश असेल. महिला उपलब्ध न झाल्यास त्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांचे आदेश अंतिम असतील.

८. **<u>पुरस्काराचे स्वरुप</u>** : पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेल्या व्यक्तींचा रु. ५१,०००/- चा धनादेश तसेच सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व एक शाल किंवा साडी तसेच श्रीफळ देवून सन्मान करण्यात येईल.

९. पुरस्कार मिळालेल्या व्यक्तीचे निधन झाले असेल तर त्यांच्या / तिच्या वारसाला शासनाच्या पूर्वपरवानगीने पुरस्कार स्वीकारण्यासाठी बोलाविले जाईल.

१०. **<u>पुरस्कारार्थीसाठी सवलती</u>** : लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार प्राप्त व्यक्तींना पुढीलप्रमाणे सोई-सुविधा देण्यात येतील.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | पुरस्कार विजेत्यास रोख बक्षिस | रू.५१,०००/- (रूपये एकावन्न हजार फक्त) पुरस्कार विजेत्यास. |
| २ | पुरस्कार विजेत्यास प्रवास भत्ता | १) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे मोफत प्रवासाची सवलत देण्यात येईल.<br>२) शासकीय विश्रामगृहात सवलतीच्या दराने उचित प्राधान्यक्रम देऊन आरक्षण देण्यात येईल. |
| ३ | इतर सवलती | पुरस्कार विजेता आणि त्याची पत्नी किंवा तिचा पती संस्थेचा प्रतिनिधी हे पुरस्कार देण्याच्या ठिकाणी तीन दिवसांपर्यंत शासनाचे पाहुणे राहतील. पहिल्या दिवशी पुरस्कार विजेत्याचे आगमन व त्याचे स्वागत करणे, दुसऱ्या दिवशी पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करणे व तिसऱ्या दिवशी पुरस्कार विजेत्यांना प्रेक्षणीय स्थळे दाखविण्याचा कार्यक्रम आयोजित करणे आणि त्यांचा राहण्याच्या जेवणाचा प्रवास भत्ता आणि स्थानिक वाहतूक खर्च शासनाकडून केला जाईल. |
| ४ | सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, साडीखण इत्यादी देणे | पुरस्कार विजेत्यास सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल किंवा साडी खण (ब्लाउजचे कापड) एक श्रीफळ (नारळ) आणि पुरस्कार विजेत्याच्या पत्नीस किंवा पतीस एक श्रीफळ. |

११. **पुरस्कार काढून घेण्याची तरतुद** : पुरस्कार प्राप्त व्यक्तीकडून भविष्यात समाजविघातक गैरकृत्य केल्यास व त्याबाबतची बाब शासनाच्या निदर्शनास आल्यास शासनास आवश्यक त्या बार्बीची खातरजमा करुन सदर पुरस्कार परत काढून घेता येईल.